|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव १६ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरशाखीय विद्याशाखा या तीन विद्याशाखांच्या अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक प्रक्रिया आज दिनांक १६ मे रोजी पार पडली. १५ अध्यक्ष बिनविरोध निवडून आले तर एका अभ्यासमंडळासाठी निवडणूक झाली.

डॉ.एपीजे अब्दुल कलाम विद्यार्थी भवनात अभ्यास मंडळांच्या सदस्यांची बैठक झाली. प्रारंभी सर्व सदस्यांची एकत्रित बैठक झाली. या बैठकीत कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी मार्गदर्शन केले. प्रा.पी.पी.पाटील यांनी अभ्यास मंडळाच्या सदस्यांकडून अभ्यासक्रम अद्ययावत असावा अशी अपेक्षा व्यक्त करताना यापुढील परीक्षांसाठी प्रश्नपेढी तयार करून ठेवावी अशी सुचना केली. कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी बी.बी.पाटील यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती दिली. १५ अभ्यासमंडळांच्या अध्यक्ष पदासाठी प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज प्राप्त झालेले असल्यामुळे त्या उमेदवारांना बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. निवडून आलेल्या अध्यक्षांना तात्काळ जागीच कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते नोटीफिकेशन देण्यात आले.

विषय निहाय बिनविरोध निवडून आलेले अध्यक्ष पुढील प्रमाणे १) मराठी-प्रा.आशुतोष पाटील (भाषा व संशोधन केंद्र,उमवि), २) हिंदी-प्रा. सुनील कुळकर्णी (भाषा व संशोधन केंद्र,उमवि), ३) इंग्रजी-प्रा.मुक्ता महाजन (भाषा व संशोधन केंद्र,उमवि), ४) इतिहास-प्रा.डी.एन.वाघ (प्रताप महाविद्यालय, अमळनेर), ५) राज्यशास्त्र-प्रा. डी. एस.निकुंभ (चाळीसगाव एज्य.सोसायटीचे महाविद्यालय,चाळीसगाव), ६) मानसशास्त्र-प्रा.जी.बी.चौधरी (अभय युवा कल्याण केंद्राचे महिला महाविद्यालय, धुळे), ७) अर्थशास्त्र-प्रा.एस.डी.पाटील(नुतन मराठा महाविद्यालय,जळगाव), ८) विधी-प्रा.बी.युवाकुमार रेड्डी (मणियार विधी महाविद्यालय,जळगाव), ९) अकौटन्सी ॲण्ड कॉस्टींग-प्रा.ए.पी.डोंगरे (व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा,उमवि), १०) कॉमर्स् ॲण्ड बिझीनेस लॉ -प्रा.पी.टी.चौधरी (मु.जे.महाविद्यालय,जळगाव), ११) मॅनेजमेंट स्टडीज- प्रा.सीमा जोशी (व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा,उमवि), १२) कॉम्प्युटर मॅनेजमेंट-प्रा.ए.पी.सरोदे (मु.जे.महाविद्यालय, जळगाव), १३) शिक्षणशास्त्र- प्रा.ए.पी.राणे (केसीईचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जळगाव), १४) शैक्षणिक मानसशास्त्र - प्रा.साहेबराव भुकन (शिक्षणशास्त्र महाविद्यालय,खिरोदा), १५) ॲडमिनीस्टेशन ॲण्ड इव्हॅल्युएशन-प्रा.वाय.एच.सनेर-(अभय युवा कल्याण केंद्राचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे)

बिझीनेस ॲडमिनीस्ट्रेशन या अभ्यासमंडळासाठी प्रा.शिल्पा बेंडाळे (केसीईचे आयएमआर इन्स्टिट्युट, जळगाव) व प्रा.एन.बी.गोसावी (जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार) या दोघांचे अर्ज अध्यक्षपदासाठी प्राप्त झाले होते. या अभ्यासमंडळासाठी झालेल्या निवडणूकीत प्रा. एन.बी.गोसावी विजयी झाले प्रा. गोसावी यांना ६ पैकी ४ मते पडली तर प्रा. बेंडाळे यांना २ मते पडली.

संरक्षण व सामरिकशास्त्र, समाजशास्त्र, समाजकार्य व बिझीनेस इकॉनॉमिक्स ॲण्ड बँकींग या चार अभ्यासमंडळांच्या अध्यक्षपदासाठी अर्ज प्राप्त न झाल्यामुळे ते रिक्त राहीले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १६ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी